ESTD 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय : दिपावली/ईद सणासाठी अग्रीमाबाबत..**

विद्यापीठातील सर्व प्रशासकीय सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, प्रतिवर्षी विद्यापीठातील ज्या सेवकांचे ग्रेड पे रू.4800/– पेक्षा कमी आहे अशा नोकरीत कायमस्वरूपी/हंगामी असणा–या प्रशासकीय सेवकांना दिपावली / ईद या सणासाठी रू.10,000/– किंवा 15,000/– इतकी रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात येते.

उपरोक्त नमुद नुसार जे सेवक दिपावली / ईद सणासाठी अग्रीम घेण्यासाठी इच्छुक आहेत त्या सर्व सेवकांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या **Employee Corner** येथून संगणक प्रणालीद्वारे **Online** अर्ज भरून त्याची स्वाक्षरी सहीत प्रत दिनांक 12 ऑक्टोबर 2022 पूर्वी पगार पत्रके विभागामध्ये सादर करावी. सदरचा Online अर्ज भरणे अनिवार्य असून मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच, संगणक प्रणालीमध्ये अर्ज सादर करताना **अग्रीम रक्कम (रू. 10,000 / रू. 15,000), ग्रेड पे, युको बॅंकचा संपूर्ण बचत खाते क्रमांक, Employee Code Number** बिनचूक टाकावा व सदर अर्जाची हार्ड कॉपी पगारपत्रके विभागात स्वाक्षरीसह जमा करावी.

(प्र.) वित्त व लेखाधिकारी

संदर्भ क्र. शिवाजी वि./लेखा/पगारपत्रके 225/ No 00135
दिनांक : : 06 ऑक्टोबर 2022 06 OCT 2022

प्रति :– सर्व अधिविभाग प्रमुख व सर्व कार्यालयीन विभाग प्रमुख, उपकुलसचिव/सहा. कुलसचिव यांनी सदरचे परिपत्रक संबंधीतांच्या निदर्शनास आणावे. तसेच आपल्या विभागामध्ये वर्ग 04 चे जे सेवक कार्यरत आहेत त्यांना सदरचा अर्ज भरून देणेबाबत सहकार्य करावे.

प्रत :– स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरू/ कुलसचिव/संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.

**दिपावली अग्रिमसाठी अटी**

1. ज्या नियमित सेवकांचे **ग्रेडवेतन 4800** पेक्षा अधिक नाही, अशा समकक्ष पूर्णवेळ सेवकास रूपये 10000 किंवा रू. 15000/– इतका अग्रीम मिळू शकेल.
2. अग्रीम रक्कम देण्यात येणा–या महिन्यापासून ज्या सेवकांची एकूण सलग नोकरी सहा महिन्यांपेक्षा कमी मुदतीची आहे अशा सेवकांना सदरचा अग्रीम मिळणार नाही.
3. दिलेली अग्रीम रक्कम दहा मासिक हप्त्यात पगारातून कपात करण्यात येईल.
4. अग्रीम परतफेडीचा हप्ता ज्या महिन्यात दिपावली असेल त्या महिन्याच्या पुढील महिन्यापासून घेतला जाईल.
5. अग्रीम स्वीकारणा–या व्यक्तीने नोकरीचा राजीनामा दिल्यास अथवा त्याच्या नोकरीची समाप्ती इ. गोष्टी घडल्यास सण अग्रीम रक्कम एक रक्कमेने परत करीन, असे लेखी निवेदन देणे अवश्यक राहील. त्यांना मिळणा–या मासिक वेतन व इतर मिळणा–या रक्कमेमधून उरलेल्या हप्तांच्यी वसुली करण्यात येईल.
6. सदरचा अग्रीम वर्षातून एकच वेळ दिला जाईल.
7. ज्या सेवकांची मागील अग्रीम वसुली झालेली नाही अशा सेवकांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही
8. ऑनलाईन अर्जाची स्वाक्षरीसहीत प्रत पगारपत्रके कार्यालयात विहीत मुदतीत जमा करणे अनिवार्य आहे.
9. मागिल वेळेस असे निर्दशनास आले आहे की, बहुतांश सेवक फॉर्म भरलेनंतर फॉममध्ये भरलेली रक्कम बदलणेबाबत विनंती करत असतात, तथापी सदरचा फॉर्म संगणक प्रणालीद्वारे ॲटो जनरेट तयार होत असलेने पुन्हा फॉर्म मध्ये दुरूस्ती करताना अडचणीचे होत असते, सबब, जो फॉर्म भरण्यात आलेला आहे तोच ग्राहय धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.